Presented by Adv.A.J.deshpande on /02/2026.

Exh. 1/B

दैनिक नोंद क्रमांक- /२०२६.

KAVITA BIPIN AGRAWAL

Digitally signed by KAVITA BIPIN AGRAWAL
Date: 2026.02.09 17:48:04 +0530

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक-25 /२०२६.

**मे.प्रमुख जिल्हा न्यायाधिशसो, कोल्हापूर,**

**यांचे कोर्टात.**

**श्री.प्रसाद बाबासो लबाजे,**

**व.व.३३, धंधा-शेती,** **अर्जदार**

**रा.कसबा सांगाव, ता.कागल, जि.कोल्हापूर.**

**विरुध्द**

**१.श्री.रघुनाथ राघो पाटील,**

**व.व.७०, धंधा-शेती,**

**रा.वाडदे वसाहत, कसबा सांगाव,**

**ता.कागल, जि.कोल्हापूर.**

Order
Issue notice to Opponents

PDJ, Kolhapur
09/02/2026

Superintendent(Lit.)
District Court,Kolhapur

२.सौ.गिता संजय जगताप,

व.व.५०, धंधा- शेती,

रा.कसबा सांगाव, ता.कागल, जि.कोल्हापूर.

३.सौ.अनुसया भिकाजी खोत,

व.व.७२, धंधा-घरकाम,

रा.रणदिवेवाडी, ता.कागल, जि.कोल्हापूर.

४.श्री.सुनील भिकाजी खोत,

व.व.५१, धंधा-शेती, वि.प.

रा.रणदिवेवाडी, ता.कागल, जि. कोल्हापूर,

५.श्री.अनिल भिकाजी खोत,

व.व.४८, धंधा-शेती,

रा.रणदिवेवाडी, ता.कागल, जि.कोल्हापूर.

६.सौ.राजाक्का प्रकाश पाटील,

व.व.५३, धंधा-घरकाम,

रा.शंकरवाडी, ता.कागल, जि.कोल्हापूर.

दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे कलम २४
प्रमाणे दावे वर्ग/एकत्र करणेसाठी अर्ज.

<u>यातील अर्जदार हे मे.कोर्टास नम्रपणे कळवतात कि,</u>

१. दावा मिळकतीचे वर्णन-

Sanjeev
Superintendent(Lit.)
District Court,Kolhapur

**मौजे रणदिवेवाडी, ता.कागल, जि.कोल्हापूर येथील शेत जमीन मिळकत, त्याचा गट नंबर १७७३/३/२, याचे क्षेत्र हे.०.२१ आर, आकार रु.१.५० पै. ची शेत जमीन मिळकत.**

२. सदर वर नमूद दावा मिळकत ही प्रस्तुत अर्जातील वि.प. क्रमांक १ याचे मालकीची असून, सदर मिळकतीच्या खरेदीसाठी म्हणून यातील अर्जदार यास वि.प.क्रमांक १ याने रीतसर व नोंदणीकृत असे साठेखत दस्त नंबर २१४२/२०१८ हे दिनांक २१/११/२०१८ रोजी नोंदवले आहे. या नोंदणीकृत साठेखताच्या पूर्ततेसाठी व सदर मिळकतीचे खरेदीपत्र पूर्ण करून देण्यासाठी म्हणून, प्रस्तुत अर्जदार याने मे.दिवाणी न्यायाधिशसो, कनिष्ठ स्तर, कागल यांचे कोर्टात दाखल केला असून, त्याचा क्रमांक नियमित दिवाणी दावा क्रमांक ८७/२०२१ असा आहे. सदर दावा हा कागल येथील न्यायालयात मे.सह दिवाणी न्यायाधिशसो, कनिष्ठ स्तर, कागल यांचे समोर चौकशीसाठी प्रलंबित आहे. सदर कामी वि.प. क्रमांक २ यांना आवश्यक पक्षकार म्हणून सामील करण्यात आले आहे. प्रस्तुत दाव्याचे कामी अर्जदार हे वादी असून, वि.प. क्रमांक १ व २ हे प्रतिवादी आहेत.

३. तसेच यातील वि.प. क्रमांक २ याने वर नमूद दावा मिळकती बाबत यातील वि.प. क्रमांक १ सोबत केलेल्या कथित नोटरी समोरील खरेदीपूर्व संचकारपत्र दिनांक २५/०४/२०१९ रोजीचे आधारे, सदर दावा मिळकतीचे खरेदीपत्र पूर्ण होऊन मिळण्यासाठी म्हणून मे.दिवाणी न्यायाधिशसो, वरिष्ठ स्तर, कोल्हापूर यांचे समोर दावा दाखल केला असून, त्याचा नोंदणी क्रमांक विशेष दिवाणी दावा क्रमांक १९०/२०२० असा असून, सदर दावा हा सध्या मे.१४ वे सह दिवाणी न्यायाधिशसो, वरिष्ठ स्तर, कोल्हापूर यांचे

Sargera
Superintendent(Lit.)
District Court, Kolhapur

समोर चौकशी साठी प्रलंबित आहे. सदर दाव्याचे कामी प्रस्तुत वि.प. क्रमांक २ या वादी व वि.प. क्रमांक १ व अर्जदार हे प्रतिवादी आहेत.

४. तसेच यातील वि.प.क्रमांक ३ ते ६ यांचे पूर्वहक्कदार श्री.भिकाजी कल्लू खोत यांनी यातील वि.प. क्रमांक १ सोबत वर नमूद दावा मिळकती बाबत केलेल्या कथित खरेदीपूर्व करारपत्र दिनांक ३१/०८/२०१८ रोजी नोटरी करून घेतलेले, याच्या खरेदीपत्राचे पूर्ततेसाठी म्हणून वि.प.क्रमांक १ व अर्जदार याचे विरुद्ध विशेष दिवाणी दावा क्रमांक ८०/२०२० हा कोल्हापूर येथील मे.दिवाणी न्यायाधिशसो, वरिष्ठ स्तर, कोल्हापूर येथे दाखल केला आहे. सदर दावा हा सध्या मे.५ वे सह दिवाणी न्यायाधिशसो, वरिष्ठ स्तर, कोल्हापूर यांचे समोर चौकशी साठी प्रलंबित आहे. सदर दाव्याचे कामी वि.प. क्रमांक ३ ते ६ हे वादी असून, अर्जदार व वि.प. क्रमांक १ हे प्रतिवादी आहेत.

५. अशा प्रकारे सदर वर नमूद दावा मिळकती बाबत वेग-वेगळ्या न्यायालयात दावे प्रलंबित असून, सध्या सर्व दावे हे चौकशी साठी प्रलंबित आहेत. सदर सर्व दाव्यांचे कामी दावा मिळकत ही एकच असून, सर्व दावे हे दावा मिळकतीचे खरेदीपत्र पूर्ण होऊन मिळण्यासाठी म्हणून दाखल करण्यात आलेले आहेत. त्यामुळे सदर दावे हे एकाच कोर्टात एकत्र होणे आवश्यक आहेत.

६. सदर वर नमूद मिळकती बाबत दाखल डाव्यांमध्ये अर्जदार व वी.प. क्रमांक २ ते ६ हे आप-आपले कायदेशीर हक्क गुंतले असल्याबाबत कथन करत असून, त्याबाबत दाद मागणी करत आहेत. त्यामुळे सदर दावे हे एकत्र एकाच कोर्टात तबदील होणे आवश्यक आहे. सदर सर्व दावे हे एकाच कोर्टात तबदील झाल्यास, सदर दावा मिळकती बाबत नोंदवण्यात आलेल्या वेग-वेगळ्या खरेदीपूर्व करारपत्रांबाबत व त्यातून निर्माण होणाऱ्या दावा

Superintendent(Lit.)
District Court,Kolhapur

मिळकती मधील त्यांच्या हक्कांबाबत न्याय्य-निर्णय करण्यास, मे.कोर्टास मदत होणार आहे व त्यामुळे एकाच मिळकतीच्या मालकी बाबत अथवा त्यातील हक्काबाबत वेग-वेगळे अथवा परस्पर विरोधी असे न्याय निर्णय टाळण्यासाठी सदर सर्व दावे हे, एकाच कोर्टात तबदील करणे आवश्यक आहे.

७. सदर दावा मिळकती बाबत दाखल करण्यात आलेल्या सर्व दाव्यांबाबत यातील वी.प. यांना संपूर्ण माहिती असूनही, सदर दावे हे प्रत्येकाने स्वतंत्ररीत्या दाकाहाल केले आहेत. परंतु सदर दाव्यामधील दावा मिळकत व पक्षकार हे एकाच आहेत व त्यातील मागणी करण्यात आलेल्या दादी याही एकाच आहेत. त्यामुळे अशा एक सारख्या मागणी करण्यात आलेल्या दादी बाबत न्याय-निर्णय हा एकाच कोर्टासमोर झाल्यास, यातील वि.प. यांचे कोणत्याही प्रकारे नुकसान होणार नसून, उलट अशा वेग-वेगळ्या दाव्यातील निकाल व न्याय निर्णय हे वेग-वेगळे दिले जाण्याची शक्यता आहे.

८. सदर वर नमूद सर्व दावे हे एकाच कोर्टात तबदील/एकत्र केले गेल्याने, यातील वि.प. यांचे कोणतेही नुकसान होणार नसून, त्यामुळे उलट न्यायदानास मदत होणार आहे. कदाचित सदर दावे हे स्वतंत्र न्यायालयात असेच चालवले गेल्यास आणि निकाली केले गेल्यास, सदर दाव्यातील दावा मिळकती बाबत गुंतलेल्या हक्कांबाबत नीर-निराळे मतांतर व त्यातून कायदेशीर गुंता-गुंत निर्माण होणार आहे. त्यामुळे सदरची गुंता-गुंत व विभिन्न मतांतर टाळण्यासाठी म्हणूनही सदर दावे हे एकत्र करणे आवश्यक आहे.

९. <u>अर्जास कारण कि,</u>

Sarjerao
Superintendent(Lit.)
District Court, Kolhapur

सदर वर नमूद सर्व दावे हे अद्यापही संबंधित कोर्टात हे चौकशी साठी प्रलंबित असून, सदर दाव्यांचे कामी अद्यापि अंतिम न्याय-निर्णय झालेला नसून, सदर डाव्यांचे कामी दावा मिळकती मध्ये अर्जदार व वि.प. यांचे गुंतलेल्या हक्कांबाबत दाखल करण्यात आलेल्या स्वतंत्र दाव्यांना दाखल करण्यास कारण घडल्याने, त्याबाबत दाखल केलेले दावे हे एकाच कोर्टात स्थानांतरीत होणे व एकत्र करणे आवश्यक आहे. सदर प्रलंबित दाव्यांबाबत वि.प. यांना माहिती असूनही, त्याबाबत कोणीही अशा प्रकारचा अर्ज दाखल केला नाही. यामुळे सर्व दावे हे वेग-वेगळ्या कोर्टात प्रलंबित असून, सदर सर्व डाव्यांमध्ये वेग-वेगळे न्याय-निर्णय होऊन, कायदेशीर गुंता-गुंत निर्माण होण्याची दाट शक्यता असल्याने, सदर दावे हे एकाच कोर्टात एकत्र होणे न्यायचे मदतीकरिता आवश्यक असल्याने, सदर अर्जास कारण घडले आहे व घडत आहे. त्यामुळे सदर अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

१०. **मुदत-** सदर अर्जास कारण हे वर कलम ९ मधील नौद केले कारणास्तव, सदर अर्ज हा मुदतीत आहे.

११. **अधिकारक्षेत्र-** सदरचा अर्ज चालवण्याचा व त्यावर न्याय निर्णय देण्याचा अधिकार मे.कोर्टास आहे.

१२. प्रस्तुत अर्जदार यांनी दावा मिळकतीच्या बाबत अथवा वर नमूद सर्व दावे हे एकत्र करण्यासाठी म्हणून, अन्य कोणत्याही कोर्टात याच मागणी बाबत अथवा मा.उच्च न्यायालयसो यांचे समोर अशा प्रकारचा अर्ज दाखल केलेला नाही अथवा तसा कोणताही अर्ज प्रलंबित नाही.

<u>१३. सबब अर्जदार यांची मे.कोर्टास नम्र विनंती कि,</u>

**अ. प्रस्तुतचा दावा खर्चासह मंजूर करण्यात यावा.**

Sanjeevani
Superintendent(Lit.)
District Court, Kolhapur

ब. प्रस्तुत दावा मिळकती बाबत दाखल करण्यात आलेले प्रलंबित दावे अ.क्र. नियमित दिवाणी दावा क्रमांक-८७/२०२१, मे.सह दिवाणी न्यायाधिशसो, कनिष्ठ स्तर, कागल, तसेच विशेष दिवाणी दावा क्रमांक-१९०/२०२० हा मे.१४ वे सह दिवाणी न्यायाधिशसो, वरिष्ठ स्तर, कोल्हापूर आणि विशेष दिवाणी दावा क्रमांक-८०/२०२० हा मे.५ वे सह दिवाणी न्यायाधिशसो, वरिष्ठ स्तर, कोल्हापूर यांचे समोरील हे सर्व दावे हे कोणत्याही एकाच कोर्टात वर्ग/एकत्र करण्यात यावेत, अशी मे.कोर्टास नम्र विनंती आहे.

क. जरूर तर अर्ज दुरुस्त करण्यास, परवानगी असावी.

ऊ. इतर न्यायचे हुकुम याचकामी देवविण्यात यावेत, अशी नम्र विनंती.

येणे प्रमाणे अर्ज असे.

कोल्हापूर. मे.जा.व्हावे.

दिनांक-०४/०२/२०२६.

प्रतिज्ञा

मी अर्जदार श्री.प्रसाद बाबासो लबाजे, व.व.३३, धंधा-शेती, रा.कसबा सांगाव, ता.कागल, जि.कोल्हापूर, सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो कि, वर नमूद अर्जातील कलम १ ते १२ मधील सर्व मजकूर हा माझे माहिती प्रमाणे खरा व बरोबर असून, कलम १३ मधील मागणी ही बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा.

कोल्हापूर.

दिनांक-०४/०२/२०२६. (अर्जदार)

Superintendent(Lit.)
District Court,Kolhapur

## शपथपत्र

मी अर्जदार श्री.प्रसाद बाबासो लबाजे, व.व.३३, धंधा-शेती, रा.कसबा सांगाव, ता.कागल, जि.कोल्हापूर, शपथेवर कथन करतो कि, वर नमूद अर्जातील कलम १ ते १२ मधील सर्व मजकूर हा माझे माहिती प्रमाणे खरा व बरोबर असून, कलम १३ मधील मागणी ही बरोबर आहे. म्हणून केले शपथपत्र.

कोल्हापूर.

दिनांक-०४/०२/२०२६. (अर्जदार)

शपथपत्र करणार यास ओळखतो.

A.J. Deshpande Adv.

(विधिज्ञ श्री.ए.जे.देशपांडे)

## प्रतिज्ञा

मी अर्जदार श्री.प्रसाद बाबासो लबाजे, व.व.३३, धंधा-शेती, रा.कसबा सांगाव, ता.कागल, जि.कोल्हापूर, सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो कि, वर नमूद शपथपत्रामधील सर्व मजकूर हा माझे माहिती प्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा.

कोल्हापूर.

दिनांक-०४/०२/२०२६. (अर्जदार)

Solemnly affirmed before me by
Shri./Smt. Prasad Babaso Labaje.
Age 33 Occp. Agri of Kasaba Sangaon.
who is identified by Shri. A.J. Deshpande,
Adv. whom I Know Personally
Dt. 04/02/2026.

Sargjenv

Superintendent(Lit.)
District Court, Kolhapur